जा.क्र. २३८५ /२०१९
दि. २२/०४/२०१९
खडक पो.स्टे.पुणे

प्रति,

मा.जनसंपर्क अधिकारी,

पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर,

यांना सविनय सादर,

रिपोर्ट :- जी.बी.क्षीरसागर पो.हवा.५५६९ खडक पोलीस ठाणे,पुणे शहर
यांजकडून विनंतीपुर्वक की,

विषय :- बेवारस स्त्री मयताचे नातेवाईकांचा यांचा शोध होणे कामी वर्तमानपत्रात फोटो प्रसारीत होणे बाबत.

---

महोदय,

खडक पोलीस स्टेशन अ.म.रजि.नं.४१/२०१९ मधील बेवारस मयत बाई नामे **ताई भोये वय-५५ वर्ष** रा.पुणे फिरस्ती पूर्ण नाव,पत्ता माहित नाही.हि दि.२८/०३/२०१९ रोजी घर क्र.१०७७ शुक्रवारपेठ पुणे समोर अजारी असल्याने तिला उपचार कामी सायं.१७/३३ वा.ससून हॉस्पीटल वार्ड नं.१४ मध्ये ॲडमिट केले होते.ती उपचारा दरम्यान दि.०६/०४/२०१९ रोजी स.०९/०० वा.वार्डात मयत झाली असून तिला मृत्यू हा **"SEPTICEMIA"(जंतूसंसर्ग)** या आजाराने आल्याचे डॉक्टरांनी ॲडव्हान्स सर्टिफिकेट दिले आहे. तसेच तिचा मृत्यू हा नैसर्गिक कारणाने आला आहे.तिने उपचार चालू असताना डॉक्टरांना तिचे नाव **ताई भोये वय-५५ वर्ष पुणे फिरस्ती** असे असल्याचे सांगितले आहे. तसेच तिचे जवळ ओळखपत्र वगैरे काही नाही.तसेच तिचे मृत्यू बाबत कोणाचीही कसलीही तक्रार नाही.तिचे वर्णन खालील प्रमाणे.

मयत बेवारस बाई नामे **ताई भोये वय-५५ वर्ष** रा.पुणे फिरस्ती पूर्ण नाव,पत्ता माहित नाही.वय ५५ वर्षे उंची ५ फुट ३ इंच,रंगाने –सावळी,डोकीचे केस वाढलेले मागील बाजूस जटा वाढलेली,शरीर बारीक जवळ ओळखपत्र वगैरे काही नाही.

तरी दाखल बेवारस स्त्री मयताचे नातेवाईक यांचा शोध होणे कामी वर्तमानपत्रात फोटो प्रसारीत होणेस विनंती आहे.